Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERN!TION!L RESE!RCH FELLOWS !SSOCI!TION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
November -2018

SPECIAL ISSUE-LXXIII,( A)

# Samiksha



**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W. Nichit

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue : Samiksha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
November 2018

## INDEX

| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महानुभवांचे लीळाचरित्र व अन्य चरित्रग्रंथ | प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 5 |
| 2 | अमरावती जिले में वर्षा विचलन का प्रमुख फसलों के वितरण पर प्रभाव – एक भौगोलिक अध्ययन | प्रा. पराग श्री. मेश्राम | 9 |
| 3 | वनौषधी सफेद मुसळीचे आर्थीक अध्ययन | प्रा.डॉ. संतोष एन ताडे | 14 |
| 4 | आसनांचा खेळाडूंच्या पायाच्या कार्यक्षमतेवर होणाऱ्या परिणामांचे चिकित्सक अध्ययन | प्रा. डॉ. सुभाष शेकोकर / नानासाहेब सपकाळ | 17 |
| 5 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा स्त्रिविषयक दृष्टीकोन | कु. स्वाती वि. डवरे | 20 |
| 6 | महात्मा गांधीजीचे ग्रामीण विकासाबाबत विचार | प्रा. सुजाता केने | 22 |
| 7 | महिला सक्षमीकरणामध्ये शासनाची भूमिका | प्रा. डॉ. वंदना फटाले | 24 |
| 8 | शारीरीक शिक्षण आणि मानवी आरोग्य सुदृढता एक चिकीत्सक अध्ययन | प्रा. आशिष गोंविदराव बरडे | 28 |
| 9 | स्त्रीवाद एक चिंतन | डॉ.वंदना पळसापुरे | 33 |
| 10 | ब्रिटीशकालीन मराठी वृत्तपत्रांचे कार्य | डॉ. प्रमोद ना. घ्यार | 37 |
| 11 | ग्रामीण साहित्याच्या प्रेरणांचा विचार | प्रा.डॉ. राजकुमार रघुनाथ मुसणे | 42 |
| 12 | किशोरावस्थेतील ताणतणाव आणि समायोजन | डॉ. प्रा. अमिता बन्नोरे | 47 |
| 13 | पश्चिम विदर्भातील एकुण ग्रामीण लोकसंख्येच्या घनतेचा भौगोलीक अभ्यास | प्रा. डॉ. राहुल इंगळे | 50 |
| 14 | चांदूर रेल्वे शहरातील ध्वनी प्रदूषणाचा क्षेत्रीय अभ्यास | प्रा. संजीव वि. भुयार | 55 |
| 15 | छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण | प्रा.डॉ. कैलाश फुलमाळी | 60 |
| 16 | भारतातील लोकशाही विकेंद्रिकरण आणि राजकारण | प्रा.कल्पना एस.गोडघाटे | 65 |
| 17 | सशक्त लोकशाही - पक्षिय निवडणूक व सुशासन | डॉ.ओमप्रकाश सा.बोबडे | 70 |
| 18 | नागपूर जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यांच्या कार्य प्रणालीचे चिकीत्सक अध्ययन | डॉ. सचिन सुरेश महल्ले | 75 |
| 19 | सहकार क्षेत्रातील महिला राजकीय नेतृत्वाची भूमिका-अहमदनगर जिल्हयातील एक अभ्यास | आगळे वैशाली रघुनाथ | 78 |
| 20 | एका अस्वस्थ मनाची वेदना : कार्यकर्ता | प्रा. हेमंतकुमार विठ्ठलराव बागडे | 82 |
| 21 | वृद्धाश्रमातील वृद्धांची भावनिक व मानसिक स्थिती - एक अध्ययन | कु. भारती रा. भडके | 84 |
| 22 | हवामान बदलाचा कृषीवर होणारा प्रभाव | डॉ.मनोज गाथे | 88 |
| 23 | भारतातील कूपोषणाची समस्या | प्रा. डॉ. सौ. अनिता एन. सोनुले | 92 |
| 24 | वैश्विक तापमान वाढ आणि त्यामुळे होणारे परिणाम | प्रा. एन. जी. सोनुले | 95 |
| 25 | भारतीय महिला आंदोलने व कौटुंबिक हिंसाचार | डॉ. सुनिल एन. साकुरे / प्रा. किशोर ना. वाहाणे | 98 |
| 26 | सुरक्षीत भविष्यासाठी आयुर्विमा | प्रा. संजय यु. उल्हे | 104 |
| 27 | गोदिंया जिल्ह्यातील भुमी उपयोजन एक भौगोलिक अध्ययन | कु. चेतना वझाडे, प्रा.डॉ.दिगांबर पारधी | 108 |
| 28 | अमरावती जिल्ह्यातील शेती कामगारांच्या संख्येत झालेल्या बदलांचा शेतीवर झालेला परिणाम एक भौगोलिक अध्ययन २००१-२०११ | प्रा. शशिकांत पी. दुपारे | 113 |
| 29 | वर्णव्यवस्थेविषयीचा ऐतिहासिक दृष्टीकोण | प्रा. डॉ. कुसमेंद्र गं. सोनटक्के | 116 |

# सुरक्षीत भविष्यासाठी आयुर्विमा

प्रा. संजय यु. उल्हे

वाणिज्य विभाग, श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा(रेल्वे)

प्रस्तावना :–

समाजामध्ये राहणा–या प्रत्येक घटकाचे स्वप्न हे कालानुरुप बदलत असतात. ती पुर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असतांना आपले तसेच आपल्या मुलांच्या, कुटुंबाच्या भविष्यासाठी सुरक्षा करणे आवश्यक असते. त्या माध्यमातुन आयुर्विमा या बाबीकडे पाहिल्या जाते. अनपेक्षितपणे उदभवणा–या विशिष्ट स्वरुपाच्या कारणामुळे किंवा एखादया घटनेमुळे मालमत्तेची, व्यवसायाची व स्वतःच्या शरीराची हानी अथवा मृत्यु त्यामुळे कुटुंबावर होणा–या आर्थिक दुष्परिणामाची भरपाई करन्याच्या दृष्टीने हानीची शक्यता असणा–या व्यक्ती आणि संस्थांनी शोधुन काढलेल्या सामाजिक सहकार्याचा महत्वाचा मार्ग म्हणजे विमा होय.

औद्योगिक क्रांती आणि माहिती तंत्रज्ञानातील बदल यामुळे आधुनिक काळात मानवी जिवनाची तसेच व्यवसायातील जोखीम फार मोठया प्रमाणावर वाढल्या आहेत. या जोखीम पुर्ण करण्यासाठी विमा एक अशी योजना आहे की, ज्यात व्यक्तीगत स्वरुपाच्या अनिश्चित किंवा संभाव्य धोक्याचे एकत्रीकरण करुन त्याला निश्चित स्वरुप दिले जाते आणि संबंधित व्यक्तीकडुन प्रत्येकी काही रक्कम विमा हप्त्याच्या स्वरुपात घेवुन त्यातुन प्रत्यक्षपणे ज्याचे नुकसान होईल त्यांना नुकसान भरपाई दिली जाते. विम्यामुळे हानी टाळता येते किंवा कमी करता येते तसेच कोणत्याही धोक्यापासुन संरक्षण प्राप्त करता येते. निश्चितता आणि अनिश्चितता प्राप्त झाल्यामुळे प्रत्येक व्यक्ती आपले भविष्य व उद्योगावर चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रीत करु शकतो. भारत सरकारच्या उपक्रम म्हणुन भारतीय जीवन विमा निगम ची निर्मिती झाली. या मध्ये आजीवन विमा योजना, कालावधी विमा योजना, बालक विमा योजना, पेंशन विमा योजना, त्याचप्रमाणे पिक विमा योजना, पशुधन विमा योजना, सागरी विमा योजना, अग्नी विमा योजना, अपघात विमा योजना, इ विमा योजना कार्यरत केल्या. विमा क्षेत्रामध्ये स्पर्धा व अधिक कार्यक्षमता पाहुन ग्राहकांचा फायदा व सरंक्षण करण्या करता अंतर्गत विम्याची बाजारपेठ खाजगी व विदेशी विमा कंपन्या व्यवसाय करीत आहे. त्यामुळे विमा धारकांना आपल्या भविष्याची योजना तयार करण्यासाठी फ़ायदा होत आहे. तसेच रोजगार निर्मिती पण होत आहे. म्हणुनच सुरक्षित भविष्यासाठी आयुर्विमा ही बाब अतिशय महत्वाची ठरु आहे.

1. विमा हा एक प्रकारचा करार असुन एक पक्ष दुस–या पक्षाला करारबध करतो.
2. विमा हा क्षतीपुर्तीचे साधन असुन सहकारीतेवर आधारित आहे.
3. विमा ही सक्तीची बचत आहे.
4. उद्योगाला सामुहिक विमा काढता येतो.
5. मानवी आयुष्यात लाभलेले एक वरदान आहे.
6. विम्यामध्ये सुरक्षा व विनियोग हे तत्व दिसुन येते.
7. विमा फक्त पुर्ण जोखमीला सुरक्षा देतो.
8. विमा हा जुगार नाही कारण हा लाभ मिळविण्यासाठी नसतो.

सुरक्षित भविष्यासाठी आयुर्विम्याची भुमिका :–

१. सामाजिक विमासाठी :–

देशाचा विकास होण्यासाठी समाजाचा विकास होणे गरजेचे आहे. म्हणुनच समाजातील गरीबी जो पर्यंत दुर होत नाही तो पर्यंत देशाचा आर्थिक विकास शक्य नाही. त्याकरीता विमा क्षेत्र समाजामधील राजणा–या गरीब लोकांना साठी व त्यांचे राहणीमान उंचविण्यासाठी व सुरक्षा प्रदान करुन देण्यासाठी विमा योजना कार्यरत आहे.

२. भांडवल गुंतवणुक :—

भारतामध्ये विमा कंपन्यांनी मोठया प्रमाणावर भांडवल गुंतवणुक करुन आपला व्यवसाय वाढविला आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीला चालना मिळाली. तसेच लोकांना गुंतविलेल्या भांडवलावर योग्य त्या प्रमाणात परतावा मिळावा म्हणुन विमा क्षेत्र अधिक चांगल्या प्रकारे काम करीत आहे.

३. बचतीचा उत्तम मार्ग :—

विमा लोकांना बचत करण्यासाठी प्रोत्साहित करणे त्यामुळे मोठया प्रमाणावर भांडवल निर्मितीला प्रोत्साहन मिळन आर्थिक विकास साहय करता येतो. बचतीच्या इतर कोणत्याही मार्गाचा वापर केल्यास त्यात पैसे त्वरीत परत मिळु शकतात परंतु यात गुंतवलेले पैसे परत मिळु शकत नाहीत त्यामुळे बचत सक्तीने होते.

४. आर्थिक सुरक्षा :—

विम्यामुळे व्यापारात लावलेला पुंजीला सुरक्षिता प्राप्त होते. विम्याच्या सुविधेमुळे व्यापारी व व्यावसायिक जोखिम व अन्य जोखीमेपासुन चिंता विरहीत व्यवसाय करतात.

५. व्यावसायिक पत कुशलतेत वाढ :—

विमा व्यवसायाची पत वृध्दी करते. व्यावसायीकांना विमा पत्राच्या आधारावर कर्ज मिळते. वित्तीय संस्था आणि इतर कर्जदाते साधारणतः त्याच लोकांना कर्ज देतात ज्यांनी आपल्या मालाचा व संपतीचा विमा केलेला असेल. विम्याव्दारे व्यवसायातील सर्व प्रकारच्या जोखीमेपासुन सुरक्षा प्राप्त केल्यामुळे व्यावसायीक आपला व्यवसाय अधिक कुशलतेने करुन त्यामध्ये अधिक भर टाकु शकते.

६. विदेशी व्यापार व विदेशी मुद्रा :—

सागरी विमा योजनेव्दारे समुद्रातील मालकाचा विमा करुन सर्व प्रकारच्या जोखमीपासुन सुरक्षीतता मिळते यामुळे विदेशी व्यापारात वाढ होते त्यामुळे एका देशातील व्यापारी दुस—या देशातील मालाची आयात—निर्यात नि संकोच करु शकतात तसेच विमा कंपनी दुस—या देशासोबत व्यवसाय करुन त्या देशातील दुर्लक्ष विदेशी मुद्रा उपलब्ध करते. या मुद्रेचा उपयोग देशाच्या विकासाकरीता उपयोगात आणला जातो.

RESEARCH JOURNEY

७. कुंटुंबासाठी व वृध्दापकाळासाठी :—

कुंटुंबाच्या भविष्यासाठी काळजी दुर कण्यासाठी विमा हा एक चांगला मार्ग आहे. विमा घेतलेल्या व्यक्तीला आपल्या पश्चात विमाच्या रक्कम आपल्या मुलांना व पत्नीला मिळण्याची तरतुद करता येते. तसेच निवृत्तीनंतर आपले जिवन व्यतीत करण्याचा आर्थिक प्रश्न विम्यामुळे सुटतो. मुलामुलींच्या भविष्याबददल वाटणारी चिंता दुर होते.

८. आयकर व मानसिक स्वास्थ :—

वर्षभरात भरलेल्या विमा हप्त्याच्या रकमेइतकी रक्कम करपात्र उत्पन्नातुन सुट मिळत असते. त्यामुळे आयकरात बचत करता येते तसेच भविष्यकाळासाठीही बचत होते. व्यक्तीला विम्यामुळे भविष्याची चिंता राहत नाही त्यामुळे मानसिक स्वास्थ चांगले राहते.

९. रोजगाराच्या संधीत वाढ :—

विम्यामुळे विभिन्न उद्योगातील गुंतवणुकीत वाढ झाली सेवा क्षेत्राचा विकास झाल्यामुळे कृषी व इतर व्यवसाय विकसीत झाल्यामुळे रोजगाराच्या संधीत वाढ होत आहे. विमा क्षेत्र हे प्रत्यक्ष रुपात हजारो लोकांना रोजगार देवुन बेरोजगारीच्या समस्येचे निराकरण करीत आहे.

१०.कामगार कल्यांणात वाढ :—

व्यवसायात शारिरिक कष्टाचे काम करणा—याला सेवेत असतांना मृत्यु येण्याची किंवा शारिरिक इजामुळे कायमचे अपंगत्व येण्याची शक्यता असते म्हणुन उद्योगाला सामुहिक विमा घेता येतो. त्यामुळे कामगारांना योग्य न्याय मिळतो.

११.औद्योगिक विकासात योगदान :—

विमा क्षेत्र हे असे क्षेत्र आहे की, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेणा–या युवकांना नवीन उपक्रम स्थापन करण्याकरीत ऋण उपलब्ध करुन देते त्यामुळे देशातील युवकांना व्यवसाय करण्यासाठी प्रेरणा मिळते याचा सकारात्मक परिणाम औद्योगिक उत्पादनात वाढ होवुन मोठया प्रमाणावर उद्योगाचा विकास घडुन येत आहे.

१२.सेवा क्षेत्राच्या विकासात :—

देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावण्याचे काम सेवाक्षेत्र करीत आहे. यामध्ये बॅंक, करीअर सेवा, पर्यटन, वायुयान, जलपान, सडक परिवहन इ. सेवा मध्ये जोखीम व्यापलेली आहे. याला साहय विमा क्षेत्राचे असल्यामुळे यामध्ये तिव्र गतीने विकास होत आहे. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास झपाटयाने होत आहे.

निश्कर्ष :—

विमाच्या सर्व प्रकारात संरक्षण आणि गुंतवणुक तसेच सुरक्षित भविष्य या बाबींची उत्कृष्ट सांगड आपणास पाहावयास मिळाली. विमा हे मानवी आयुष्यास लाभलेले एक वरदानच आहे. ज्यात संरक्षण आणि गुंतवणुक या दोन्ही बाजु असुन दोन्ही लाभ विमेदारास मिळत असतात. विमा ही एक परस्पर सहकार्याच्या तत्ववार आधारलेली योजना असुन संभाव्य धोका जानवणा–या सर्व व्यक्तीएकत्र येतात. घ्यावयाच्या स्वरुपात जमा होणा–या रकमेतुन ज्यांचे प्रत्यक्ष नुकसान होईल. त्यांच्या नुकसानीची भरपाई करता हे कार्य करण्यासाठी विमा संस्था मध्यस्थाचे काम करतात म्हणुन प्रत्येक विमेदार विमा कंपनीशी स्वतंत्रपणे करार करतो विमा हा सेवा व्यवसाय असुन विमा ही एक सामाजिक जाणीव आहे. असे म्हणता येईल. जागतीककरणाच्या जोखमींना न घाबरता केवळ जनसुखासाठी कार्य करणारी वीमा कंपनी आज सर्वच अर्थाने सर्व भारतीय महामंडळ समोर एक आदर्श ठरली आहे. विमा ही जोखीम अस्थिरता दुर करुन स्थिरता आणण्यास एक मोलाची भुमिका वटवित आहे. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेला निरंतर विकास करण्याची विम्याची भुमिका मोलाची आहे. भविष्यातील संकटांना सुरक्षा प्रदान करण्याचे कार्य विमा कंपन्या करतात. यामधुन व्यापारी क्षेत्र, समाज, सरकार शेतकरी या सर्वांना फायदा मिळतो विमा कंपन्यांना एक प्रगतीशिल उद्योग म्हणुन मान्यता मिळाली आहे. म्हणुनच सुरक्षित भविष्यासाठी विमा हा एक योग्य पर्याय आहे. असे म्हणण्यास वावगे ठरणार नाही.

संदर्भ :—

1. विमाशास्त्र – डॉ. सी. जे. जोशी, प्रा. सुधाकर मानकर
2. एल.आय.सी. डायरी – 2018
3. योजना आयोग मासिक –
4. विमा एक नविन विचारधारा – डॉ. संजीव कुमार, डॉ. डी. एस. दहिया.